# जाहिर प्रकटन

जिल्हा परिषद सरळसेवा भरती 2023 मधील आरोग्य सेवक पुरूष 50% संवर्गातील पदभरतीबाबत उमेदवारांचे समुपदेशन दि-25/04/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद सातारा यांचे अध्यक्षेतेखाली श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, चौथा मजला, सातारा जिल्हा परिषद सातारा येथे प्रस्तावित करण्यात आले आहे. तरी उमेदवारांनी उपरोक्त दिनांकास व वेळेस बिनचूक उपस्थित रहावे. जे उमेदवार समुपदेशनास उपस्थित राहणार नाहीत त्यांच्या पदस्थापने विषयी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचेस्तरावर निर्णय होवून तो संबंधित उमेदवारास बंधनकारक राहिल. तसेच समुपदेशन प्रक्रियेत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करण्याचा अथवा इतर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास प्रशासन त्याची गंभियाने दखल घेईल याची नोंद घ्यावी.

आरोग्य सेवक पुरूष 50% संवर्गातील उमेदवारांची अंतिम निवड यादी तसेच प्रतिक्षा यादी मा.अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी सातारा यांचे मान्यतेअंती यथावकाश प्रसिध्द केली जाईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने**

दिनांक:- 21/04/2025
स्थळ:- सातारा

21/4/25

**(डॉ.महेश खलिपे)**
**सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हा आरोग्य अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद सातारा**